रजिस्ट्री सं. डी. 221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 2] नई दिल्ली, 9 नवम्बर, 2006/18 कार्तिक (शके) 1928 [खण्ड 15

No. 2] NEW DELHI, 9TH NOVEMBER, 2006/18 KARTIKA (SAKA) 1928 [Vol. 15

अंक २] नवी दिल्ली, ९ नोव्हेंबर, २००६/१८ कार्तिक (शके) १९२८ [खंड १५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 9 नवम्बर, 2006/18 कार्तिक (शके) 1928

(1) दि नार्कोटिक ड्रग्ज ॲण्ड सायकोट्रोपिक सबस्टन्सेस एक्ट, 1985, (2) दि एक्स्ट्राडीशन एक्ट, 1962, (3) दि प्रिझनर्स (अटेन्डन्स इन कोर्ट्स) एक्ट, 1955, (4) दि ट्रान्सफर ऑफ प्रिझनर्स एक्ट, 1950, (5) दि सिगारेटस् एण्ड अदर टोबॅको प्रॉडक्टस् (प्रोहिबिशन ऑफ एडव्हरटाईझमेन्ट एण्ड रेग्युलेशन ऑफ ट्रेड एण्ड कॉमर्स, प्रोडक्शन, सप्लाय एण्ड डिस्ट्रीब्युशन) एक्ट, 2003, (6) दि एग्रीकल्चरल एण्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्टस् एक्सपोर्ट डेव्हलपमेन्ट एथोरीटी एक्ट, 1985, (7) दि हज कमिटी एक्ट, 2002, (8) दि फॉरेन ट्रेड (डेव्हलपमेन्ट एण्ड रेग्युलेशन) एक्ट, 1992, (9) दि स्पेशल कोर्ट (ट्रायल ऑफ ऑफेन्सेस रिलेटिंग टू ट्रॅन्झेक्शन्स इन सिक्युरीटीज) एक्ट, 1992, (10) दि एअर क्राफ्ट एक्ट, 1934, (11) दि नेशनल एनव्हायरमेंट ट्रिब्युनल एक्ट, 1995, के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधिन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जाऐंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 9th November 2006/18 Kartika (Saka) 1928

The Translations in Marathi of the (1) The Narcotic Drugs and Psychotropic Substances Act, 1985, (2) The Extradition Act, 1962, (3) The Prisoners (Attendance in Courts) Act, 1955, (4) The Transfer of Prisoners Act, 1950, (5) The Cigarettes and Other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act, 2003, (6) The Agricultural and Processed Food Products Export Development Authority Act, 1985, (7) The Haj Committee Act, 2002, (8) The Foreign Trade (Development and Regulation) Act, 1992, (9) The Special Court (Trial of offences relating to transactions in securities) Act, 1992, (10) The Aircraft Act, 1934, (11) The National Environment Tribunal Act, 1995, are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws ) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली, दिनांक ९ नोव्हेंबर २००६/१८ कार्तिक (शके) १९२८

पुढील अधिनियमांचे म्हणजे (१) दि नार्कोटिक ड्रग्ज अँन्ड सायकोट्रोपिक सब्स्टन्सेस ॲक्ट, १९८५ (२) दि एक्स्ट्राडीशन ॲक्ट, १९६२, (३) दि प्रिझनर्स (अटेन्डन्स इन कोर्ट्स) ॲक्ट, १९५५, (४) दि ट्रान्सफर्स ऑफ प्रिझनर्स ॲक्ट, १९५०, (५) दि सिगारेटस् अँन्ड अदर टोबॅको प्रॉडक्ट्स (प्रोहिबिशन ऑफ ॲडव्हरटाईझमेंट अँन्ड रेग्युलेशन ऑफ ट्रेड अँन्ड कॉमर्स, प्रॉडक्शन, सप्लाय अँन्ड डिस्ट्रीब्युशन) ॲक्ट, २००३, (६) दि एग्रीकल्चरल अँन्ड प्रोसेसड फुड प्रॉडक्टस एक्सपोर्ट डेव्हलपमेंट ॲथोरिटी ॲक्ट, १९८५, (७) दि हज कमिटी ॲक्ट, २००२, (८) दि फॉरेन ट्रेड (डेव्हलपमेंट अँन्ड रेग्युलेशन) ॲक्ट, १९९२, (९) दि स्पेशल कोर्ट (ट्रायल ऑफ ऑफेन्सेस रिलेटिंग टू ट्रॅन्झॅक्शन्स इन सिक्युरीटीज्) ॲक्ट, १९९२, (१०) दि एअर क्राफ्ट ॲक्ट, १९३४, (११) दि नॅशनल एनव्हायरमेंट ट्रिब्युनल ॲक्ट, १९९५, या अधिनियमांचे मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रसिद्ध करण्यात येत असून प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ (१९७३ चा अधिनियम क्रमांक ५०) याच्या कलम २, खंड (क) अन्वये हे अनुवाद त्या अधिनियमांचे प्राधिकृत पाठ आहेत असे समजले जाईल.

## निर्देशसूची

## INDEX


| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५.<br>The Narcotic Drugs and Pshychotropic Substances Act, 1985. | २८ |
| २ | प्रत्यपर्ण अधिनियम, १९६२.<br>The Extradition Act, 1962. | ७८ |
| ३ | कैदी (न्यायालयातील उपस्थिती) अधिनियम, १९५५.<br>The Prisoners (Attendance in Courts) Act, 1955. | ८८ |
| ४ | कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५०.<br>The Transfer of Prisoners Act, 1950. | ९२ |
| ५ | सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३.<br>The Cigarettes and other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act, 2003. | ९३ |
| ६ | कृषि व संस्करित अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५.<br>The Agricultural and Processed Food Products Export Development Authority Act, 1985. | १०५ |
| ७ | हज समिती अधिनियम, २००२.<br>The Haj Committee Act, 2002. | ११६ |
| ८ | विदेश व्यापार (विकास व विनियमन) अधिनियम, १९९२.<br>The Foreign Trade (Development and Regulation) Act, 1992. | १२९ |
| ९ | विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) अधिनियम, १९९२.<br>The Special Court (Trial of Offences Relating to Transactions in Securities) Act, 1992. | १३५ |
| १० | वायुयान अधिनियम, १९३४.<br>The Aircraft Act, 1934. | १४० |
| ११ | राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण अधिनियम, १९९५.<br>The National Environment Tribunal Act, 1995. | १४९ |

# कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५०

**(१९५० चा अधिनियम क्रमांक २९)[१]**

(६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान )

[१२ एप्रिल, १९५०]

**कारागृहामध्ये बंदिस्त केलेल्या कैद्यांना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलविण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

संसदेद्वारे खालीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

१. (१) या अधिनियमास, " कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५० " असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार * * * * *[२] संपूर्ण भारतभर आहे.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात,—

(क) " न्यायालय " यात, दिवाणी, फौजदारी किंवा महसुली अधिकारितेचा वैधरीत्या वापर करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

[३][(ख) संघराज्यक्षेत्राच्या बाबतीत " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, त्या संघराज्यक्षेत्राचा प्रशासक, असा आहे ;]

(ग) " कारागृह " यात, राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे जे ठिकाण दुय्यम तुरुंग असल्याचे जाहीर केले असेल अशा कोणत्याही ठिकाणाचा समावेश होतो.

**कैद्यांना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलविणे.**

३. (१) जेव्हा एखादी व्यक्ती,—

(क) मृत्यू शिक्षादेशान्वये ; किंवा

(ख) कारावासाच्या किंवा काळ्या पाण्याच्या शिक्षादेशान्वये, किंवा त्याऐवजी ; किंवा

(ग) द्रव्यदंड भरण्यास कसूर केल्यामुळे ; किंवा

(घ) शांतता राखण्यासाठी किंवा चांगली वर्तणूक ठेवण्यासाठी जमानत देण्यात कसूर केल्यामुळे,

एखाद्या राज्यातील एखाद्या कारागृहात बंदिस्त असेल तेव्हा, त्या राज्याचे शासन, कोणत्याही अन्य राज्याच्या शासनाच्या संमतीने, आदेशाद्वारे, त्या कैद्यास त्या कारागृहातून दुसऱ्या राज्यातील कोणत्याही कारागृहात हलविण्याची तरतूद करू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीला ज्या कारागृहात हलविण्यात आले असेल त्या कारागृहाचा प्रभारी अधिकारी, अशा व्यक्तीची ज्याद्वारे रवानगी करण्यात आली असेल असा कोणताही रिट, वॉरंट किंवा न्यायालयाचा आदेश यांच्या निकडीनुसार, शक्य असेल तेथवर, अथवा कायद्याच्या रीतसर कार्यवाहीच्या ओघात, अशा व्यक्तीला मुक्त करण्यात येईपर्यंत अथवा हलविले जाईपर्यंत तिला दाखल करून घेईल व स्थानबद्ध करील.

४. [१९०० चा अधिनियम तीन, कलम २९ ची सुधारणा] निरसन व विशोधन अधिनियम, १९५७ (१९५७ चा ३६) कलम २ व अनुसूची एक द्वारे निरसित करण्यात आला.

---

१. या अधिनियमाचा विस्तार —
१९६१ चा विनियम ७ द्वारे कोहिमा व मोकोकचुंग जिल्ह्यांवर ;
१९६३ चा विनियम ६ द्वारे दादरा व नगर हवेलीवर ;
१९६३ ची अधिसूचना क्र. ४३०, दिनांक ९ मार्च, १९६५, पहा-**भारताचे राजपत्र**, भाग दोन, कलम ३ (झ), इंग्रजी पृष्ठ ४६८ द्वारे गोवा, दमण व दीव वर आणि
१९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूची द्वारे पाँडेचेरीवर करण्यात आला आहे.

२. १९६८ चा अधिनियम, २५, कलम २ व अनुसूची द्वारे " जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून " हे शब्द वगळण्यात आले (१५ ऑगस्ट, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. विधी अनुकूलन आदेश (क्र. ३) १९५६ याद्वारे मूळ खंडाऐवजी दाखल केला.